सकाळ
सिंधुदुर्ग, गुरुवार, ८ सप्टेंबर २०२२



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात गणेशोत्सवात सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

# हळबे महाविद्यालयात गणेशोत्सव

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात हॉटेल मॅनेजमेंट विभागाच्या वतीने एकदिवसीय गणेशोत्सव साजरा करण्यात आला. समाजात एकोपा व संस्कृतीचे दर्शन घडवण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची सुरवात केली. हा गणेशोत्सव आज महाराष्ट्रातील लोकप्रिय सण बनला आहे. गणेशोत्सवात कोकणात घरगुती व सार्वजनिक गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात येते. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह आणि भक्तीचा उत्सव. त्या पार्श्वभूमीवर प्रथमच हळबे महाविद्यालयाच्या हॉटेल मॅनेजमेंटतर्फे एकदिवसीय गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या विभागाचे प्रमुख कौशिक शेट्ये यांच्या हस्ते गणेशपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध आरत्या, भजने, फुगड्या सादर केल्या. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, हॉटेल मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख शेट्ये, त्यांचे सहकारी रोहन बागकर आणि अशिता नाईक आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा. शेट्ये, प्रा. बागकर, प्रा. नाईक व हॉटेल मॅनेजमेंट विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.